राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र. रामाआ/१८६०/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १.

श्री.विकास आकाराम कोळेकर. अपिलार्थी

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी,
कुची मंडल कार्यालय, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली. उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कवठेमहाकाळ यांचे कार्यालय,
कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.

व्दितीय अपील सुनावणी दिनांक २०/१२/२०२२

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६/०४/२०१६ | ३०/०५/२०१६ | २८/०६/२०१६ | - |

अपिलार्थी यांनी दि ०६/०४/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले.

प्रस्तुत द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जोडपत्र 'अ' मध्ये जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

' मौजे नागज, तालुका कवठेमहांकाळ हद्दीतील गट नं १३९ मधील फेरफार नं ४३०४ मध्ये सध्याचे जमीन मालक श्री. आकाराम हरीबा कोळेकर, रावसो, भावसो, मारुती हरिबा

कोळेकर यांच्या जमिनीतून नेमके भूसंपादित झालेले क्षेत्र आहे हे चतु:सीमा, आकडेवारी दर्शविणाऱ्या कागदपत्रांच्या, दस्तऐवजांच्या सर्व साक्षांकीत प्रती द्याव्यात.'

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये 'माहिती देण्याचे जाणीवपूर्वक टाळले आहे.' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक २६/०४/२०१६ रोजीचा असुन तो तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, कुची मंडल कार्यालय, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली यांचेकडे केलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले असून मुद्दा क्र.४ ची माहिती पुरविली आहे.

२) अपिलार्थीचे प्रथम अपिल दिनांक २८/०६/२०१६ रोजीचे असुन त्यानुषंगाने तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आदेश पारीत करण्याची कार्यवाही केलेली नाही, असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते.

३) तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील आदेश पारीत केला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(६) चा भंग केलेला असल्याने ते शिस्तभंग विषयक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

४) अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना 'मुदतीत माहिती दिली नाही' असे प्रयोजन नमूद केले.

सबब, या प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामुल्य पुन्हा पुरवावी.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय-कवठेमहांकाळ जिल्हा सांगली यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करून अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि. १२/१२/२००७ व

परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४ /प्र.क्र.१५४/०७ /०६ दि. ३१/३/२००८ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये ? याचा लेखी खुलासा १५ दिवसांचे आत आयोगास सादर करावा अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३) जिल्हाधिकारी, सांगली यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालिन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) /सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र. 1354/2022/(सामान्य)/1860/2017 दिनांक - 11/6/2022

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित</u>-

जिल्हाधिकारी, सांगली, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/ प्र. क्र. २१९/०८/९(मा. अ.), दि. १०/०६/२००८ मधील सूचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांना (नोंदणीकृत टपालाद्वारे)सदरचा आदेश बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.